मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ । पान १

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# पालिकेच्या अग्निशमन विभागाच्या ताफ्यात ४ वाहने नव्याने दाखल..!

## नव्याने १५ अग्निशमन वाहने ताफ्यात दाखल केली जाणार आहेत

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा सक्षम असणे गरजेचे असून त्या दृष्टीने महापालिकेने अग्निशमन विभागाचे सक्षमीकरण सुरू केले आहे. अदयावत अग्निशमन वाहने, पुरेसे अग्निशमन केंद्र आणि आवश्यक अग्निशमन जवान उपलब्ध करून देण्यावर महापालिका प्रशासन भर देत आहे. त्यामुळे अग्निशमन दल सक्षम होत असून शहरवासियांच्या सेवेसाठी अधिक क्षमतेने कार्यरत राहील, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.महापालिकेची अग्निशमन यंत्रणा बळकट करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका विविध उपक्रम राबवित असते. याच



अनुषंगाने महापालिकेने नव्याने १५ अग्निशमन वाहने ताफ्यात दाखल केली जाणार आहेत. त्यातील ४ वाहने आज दाखल झाली असून या वाहनांचे लोकार्पण आज आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य इमारतीत करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उल्हास जगताप, अग्निशमन विभागाचे उप आयुक्त मनोज लोणकर, यांत्रिकी विभागाचे सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, कार्यकारी अभियंता कैलास दिवेकर, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे आदी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, नागरिकांची सुरक्षा आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी पालिकेचा अग्निशमन विभाग कटिबध्द आहे. नवीन वाहने ताफ्यात समाविष्ट झाल्याने अग्निशमन यंत्रणेच्या बळकटीकरणाच्या दिशेने पडलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांनी खरेदी प्रक्रियेतील नियोजन आणि अंमलबजावणीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, अग्निशमन विभागासाठी चार वाहनांच्या केलेल्या खरेदीमुळे आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देण्याची क्षमता वाढली असून आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आम्ही कायम वचनबद्ध आहोत. उपायुक्त मनोज लोणकर म्हणाले, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी आधुनिक फायर टेंडर्समुळे आपत्कालीन परिस्थितीला त्वरीत प्रतिसाद देण्याची पालिकेच्या क्षमतेमध्ये लक्षणीयरीत्या वाढ झाली आहे.आज दाखल झालेली अग्निशमन वाहने ही आधुनिक प्रणालीची असून या सर्व वाहनांमध्ये आधुनिक यंत्रसामुग्री आहे. या वाहनांमध्ये असलेल्या सर्व प्रणालींची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी घेतली. अग्निशमन विभागाच्या ताफ्यात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या वाहनांमध्ये विविध विशेष वाहनांचा समावेश आहे. यामध्ये ७० मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म, ५४ मीटर आणि ३२ मीटर टर्न टेबल लॅडर्स, वॉटर कॅनन्स, श्वास उपकरण वाहन, ड्राय केमिकल पावडर वाहन, फोम टेंडर आणि आधुनिक प्रकारच्या बचाव कराणाऱ्या वाहनांचा समावेश आहे. गुरुवारी समाविष्ट झालेल्या चार वाहनांमुळे आता अग्निशमन विभागाकडे एकुण वाहनांची संख्या ३२ इतकी झाली आहे. आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी येत्या काळात आणखी १४ नवीन वाहनांची खरेदी करण्यात येणार आहे.

# भाजयुमो आयोजित नमो चषक २०२४ पारितोषिक वितरण

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण

**। पिंपरी-चिंचवड।** देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पक्षाच्या वतीने राज्यभरात 'नमो चषक २०२४' या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली तसेच चिंचवड विधानसभा आमदार अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड विधानसभा कार्यक्षेत्रातील तानाजीनगर येथे 'श्री शिवाजी उदय मंडल' व भाजयुमो सरचिटणीस शिवम डांगे यांच्या संयोजनाने नमो चषक २०२४ स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.या स्पर्धेतंर्गत प्रामुख्याने स्केटिंग, जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, ऍथलेटिक्स, रनिंग, रस्सीखेच, रांगोळी, चित्रकला, ब्रॉड जम्प, ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी संगीत खुर्ची आणि थ्रो-बॉल स्पर्धा घेण्यात आल्या. आमदार अश्विनी जगताप यांनी स्पर्धेस उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवून त्यांना प्रोत्साहित केले. या खेळात अनेक चिमुकल्यांसह तरुण खेळाडूंनीही उत्कृष्ट खेळ खेळत उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक सहभागी खेळाडूला प्रशस्तीपत्र व विजेत्यांना मेडल्स आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यात्प्रसंगी, भाजयुमो महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, भाजयुमो पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष तुषार हिंगे, भाजयुमो प्रदेश सचिव अजित कुलथे, भाजपा ज्येष्ठ नेते महेश कुलकर्णी, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, मोरेश्वर शेडगे, सुरेश भोईर, श्री शिवाजी उदय मंडळ अध्यक्ष गोडसे सर, भाजपा शहर उपाध्यक्ष रवींद्र देशपांडे, शेखर चिंचवडे, सचिव मधुकर बच्चे, रावेत काळेवाडी मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, प्रभाग स्विकृत सदस्य विठ्ठल भोईर, भाजयुमो चिंचवड विधानसभा संयोजक योगेश चिंचवडे, प्रशांत आगज्ञान, सांस्कृतिक आघाडी धनंजय शाळिग्राम, भाजयुमो सरचिटणीस दीपक नागरगोजे, सतीश नागरगोजे, सचिन बंदी, कार्ती क्रिश्नन, भाजयुमो विद्यार्थी विभाग संयोजक कपिल अगज्ञान, चंद्रशेखर जोगदंड, मयूर काळभोर, बाळासाहेब टोनपेकर, अनिकेत दळवी यांच्या भाजयुमो पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आरटीईसाठी पालकांचा तहसील कार्यालयावर धडक मोर्चा!

## खाजगी विनाअनुदानित शाळा आर.टी.ई अंतर्गत आल्या पाहिजेत अशी मागणी




**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आर.टी.ई प्रक्रियेतून खाजगी विनाअनुदानित शाळा वगळण्यात आल्यामुळे आम आदमी पार्टीने पालकांसोबत शुभश्री रेसिडेन्सी ते निगडी येथील अप्पर तहसील कार्यालय पर्यंत धडक मोर्चा काढला. पालकांच्या वतीने जयदीप सूर्यवंशी, पूनम गीते, कैनात शेख, सुनिल बोडरे यांनी मनोगत व्यक्त केले आणि खाजगी विनाअनुदानित शाळा आर.टी.ई अंतर्गत आल्या पाहिजेत अशी मागणी केली. शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खासगी शाळांतील २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेश दिला जातो. त्यात खाजगी विनाअनुदानित इंग्रजी शाळांचे प्रमाण अधिक असते. राज्यातील सुमारे एक लाखांपेक्षा जास्त जागांवर विद्यार्थी आरटीई अंतर्गत ऑनलाइन पद्धतीने प्रवेश घेतात.

आर.टी.ई अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम राज्य शासनाकडून संबंधित शाळांना दिली जाते. मात्र शुल्क प्रतिपूर्तीला विलंब होत असल्याने शाळाचालकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे कोट्यवधींची शुल्कप्रतिपूर्ती थकित आहेत. राज्य सरकारने शुल्क प्रतिपूर्तीची थकीत रक्कम संबंधित शाळांना देऊन खाजगी विनाअनुदानित शाळा आर.टी.ई अंतर्गत आणाव्यात अशी मागणी आपच्या शहर अध्यक्ष मीना जावळे यांनी केली. आम आदमी पार्टीच्या वतीने प्रवक्ते प्रकाश हगवणे, महिला अध्यक्ष सरोज कदम, मोहसीन गडकरी, सुरेश बावनकर, दमयंती नेरकर यांनी मनोगत व्यक्त केले.राज्य सरकार आर.टी.ईच्या प्रक्रिये मधून खाजगी विनाअनुदानित शाळांना काढत आहे, याचा अर्थ आर.टी.ई फक्त नावाला राहील. कारण ९०% पेक्षा अधिक शाळा ह्या खाजगी विनाअनुदानित आहेत. ज्यामध्ये विद्यार्थी प्रवेश घेतात. जे विद्यार्थी प्रवेश घेतात ते अर्थिक, वंचित घटकातून येतात. या निर्णयामुळे बहुतांश विद्यार्थी चांगल्या शाळेत प्रवेश घेण्यापासून वंचित राहतील. दुसरी महत्वाची गोष्ट खाजगी विनाअनुदानित शाळांच्या मनमानी कारभारामुळे ज्यांचे प्रवेश मागील काही वर्षांमध्ये आर.टी. ई अंतर्गत झाले आहेत त्यांचे प्रवेश सुद्धा धोक्यात येऊ शकतात अशी भीती पालकांच्या मनात आहे.

# पाटी एकांकिकेने पटकावला लक्ष्मण जगताप करंडक

## प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात तीन दिवस ही एकांकिका स्पर्धा पार पडली



**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकनेते लक्ष्मणभाऊ कला आणि क्रीडा अकादमीच्या वतीने लक्ष्मण जगताप करंडक राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये एकदम कडक नाट्यसंस्था मुंबईच्या पाटी एकांकिकेने सर्वोत्कृष्ट एकांकिकेचा मान पटकाविला. अभिनेते पुष्कराज चिरपुटकर, आमदार अश्विनी जगताप, भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात १९, २० व २१ फेब्रुवारी असे तीन दिवस ही एकांकिका स्पर्धा पार पडली. लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष आहे. त्याला राज्यभरातील स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेत एकदम कडक नाट्यसंस्था मुंबईच्या पाटी एकांकिकेने सर्वोत्कृष्ट एकांकिकेचा मान पटकावला. स्वामी नाट्यांगण, डोंबिवलीची फक्त २ मिनीटं दुसरी, तर मराठवाडा विद्यापीठाचे वाणिज्य महाविद्यालय पुणेची सिनेमाही एकांकिका तिसरी आली. विजेत्यांना सुप्रसिध्द नाट्यचित्रपट अभिनेते पुष्कराज चिरपुटकर, आमदार अश्विनी जगताप, भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. यावेळी भाजपचे उपाध्यक्ष राजू दुर्गे, कोशाध्यक्ष संतोष निंबाळकर, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ठ पश्चिम महाराष्ट्र संयोजक नरेंद्र आमले, सहसंयोजक संजय हिरवे, सांस्कृतिक प्रकोष्ठ पिंपरी-चिंचवड संयोजक विजय भिसे, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, स्मिता बारवकर, नितीन गावडे आदी उपस्थित होते.

# हा नणंद भावजयाचा कौटुंबिक कार्यक्रम नाही

## बारामतीची निवडणूक सिरिअस घेतली; सुप्रिया सुळेंचे आव्हान



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बारामती लोकसभेची निवडणूकही नणंद भावयजाचा कौटुंबिक कार्यक्रम नाही, सरपंचपदापासून लोकसभेपर्यंत प्रत्येक निवडणूक सिरिअसली घेतली पाहिजे असं वक्तव्य करत खासदार सुप्रिया सुळे यांनी आपण निवडणुकीसाठी तयार असल्याचं सांगितलं. कुणीही उमेदवार असो, बारामतीच्या प्रश्नावर मी कुणाशीही चर्चा करायला तयार आहे असंही त्या म्हणाल्या. मी राजकारणात फसवणूक केली असं हर्षवर्धन पाटील म्हणूच शकणार नाहीत असं म्हणत त्यांनी अजित पवारांनाही टोला लगावला. सुप्रिया सुळे इंदापुरात बोलत होत्या. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''नणंद भावजय असं तुम्ही बघता, पण हा कौटुंबिक कार्यक्रम नाही. माझी लढाई वैचारिक आहे. माझ्या विरोधात कुणीही उभा राहिलं तरीही त्याच्यासोबत ते म्हणतील ती जागा आणि म्हणतील ती वेळ, त्यावर चर्चा करायला तयार आहे. कोण माझ्याविरोधात उभा राहील माहीत नाही. मी तीन निवडणूक लढले. भाषण करायला तुम्ही मला निवडून पाठवले आहे. मी अनेक लोकांची संसदेतील भाषणे ऐकते. सरपंचपासून लोकसभेपर्यंत प्रत्येक इलेक्शन सिरियसली घेतले पाहिजे.''नेहमी दौरा करतो आहे तसाच आजचा दौरा आहे. राज्यात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत दुष्काळी परिस्थिती होईल. सरकारला या आधीच सांगत होते की काहीतरी उपाययोजना करा. आता काही ठिकाणी दुष्काळ जाहीर केला. सध्या अडचणींचा काळ आहे. २०० आमदारांचे सरकार आहे पण या शेतकऱ्यांसाठी वेळ नाही. ड्रग्जबद्दल अनेकदा मी बोलले आहे. ललित पाटील घटना झाली त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केलं होतं की ड्रग्जच्या बाबतीत राजकारण नको. ड्रग्जच्या बाबतीत जर सरकार काही करणार असेल तर आम्ही ताकदीने उभा राहू. ओरिजिनल पेक्षा इन्कामिंगला भाजप जास्त महत्त्व देत आहे. ज्या मुंडे साहेबांनी भाजपसाठी संघर्ष केला त्यांच्या कुटुंबातील लोकांसाठी वेळ नाही. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांना मंत्री केलं. काश्मीर ते कन्याकुमारी हाच प्रश्न आहे. जावडेकर, माधव भंडारी यांनी संघर्ष केला, त्यांना पक्षाने काय दिले? ज्यांच्यावर आरोप केलं ते चांदीच्या ताटात जेवत आहेत आणि संघर्ष ज्यांनी केला ते सतरंज्या उचलत आहेत. अंकिता पाटील यांनी त्यांच्या भावना मांडल्या आहेत. त्यांचा तो महायुतीचा प्रश्न आहे. काही नाती ही राजकारण पलीकडे असतात. आमचे राजकीय मतभेद असले तरी मनभेद होऊ देत नाही. ज्यांनी मला मदत केली ते मी विसरू शकत नाही. मी फसवणूक केली असं हर्षवर्धन पाटील माझ्याबद्दल असं बोलू शकत नाही. माझे लोकशाहीवर प्रचंड प्रेम आहे. माझ्यासाठी संसद हे मंदिर आहे. मोदी देखील संसदेच्या पायरीवर नतमस्तक झाले. काल मी दौंडला होते, माझी मागणी आहे की जल जीवन मिशनचे ऑडिट केलं पाहिजे. कामाचा दर्जा नाही, वेळेवर काम नाही, हर घर जल ही यंत्रणा होती तशी झाली नाही. जल जीवन मिशनचा सरकारने व्हाईट पेपर काढावा. शेती आणि आरोग्य खाते काम करत नसेल तर त्याची माहिती पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या कानावर घालेन. शेती आणि आरोग्य खाते काम करत नसेल तर त्याची माहिती पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या कानावर घालेन. १९६७ साली शरद पवार पहिल्यांदा आमदार झाले. तेव्हापासून आजपर्यंत साथ देत आहेत. शरद पवार देशातील सगळ्यात मोठा शेतकऱ्यांचा नेता आहे.

### मी पाण्याच्या प्रदूषण वर बोलले

» शरद पवार शेतकऱ्यांचा नेता आहे. आरक्षणच्या बाबतीत जी सरकारची भूमिका आहे ती फसवी आहे. सरकार काहीही निर्णय घेऊ शकते, पण हे सरकार आरक्षणाचा निर्णय का घेत नाही? सरकारच्या जुमलेबाजीची आम्हाला सवय झाली आहे मोदी सरकारने व्हाईट पेपर काढला, काँग्रेसने ब्लॅक पेपर काढला. मोदींनी किती घोषणा केल्या आणि स्कीम किती आणल्या याची माहिती त्यामध्ये देण्यात आली. अनेकदा मी पाण्याच्या प्रदूषण वर बोलले आहे. आपण सगळ्यांनी मिळून देशात एक उपक्रम राबवायला पाहिजे. महानंद ही संस्था उभी करणे मोठे असते, पण लाटणे सोपं आहे. अदृश्य शक्तीला ती गुजरातला न्यावेसं वाटलं असेल. महाराष्ट्राचे अस्तित्व कमी करण्याचे काम केंद्र सरकार करते आहे.

# पुण्यातून देवेंद्र फडणवीस उभे राहिले तरी मीच जिंकणार!

## आजवर पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी राहिले : आ. रविंद्र धंगेकर




**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशातील लोकसभा निवडणुक काही महिन्यावर येऊन ठेपली आहे.त्या पार्श्वभूमीवर प्रत्येक राजकीय पक्षाकडून बैठका सुरू आहे.

दरम्यान पुणे लोकसभा मतदार संघातून भाजपकडून जगदीश मुळीक, मुरलीधर मोहोळ,सुनील देवधर,तर काँग्रेसकडून अरविंद शिंदे,मोहन जोशी,रविंद्र धंगेकर,मनसेकडून वसंत मोरे,साईनाथ बाबर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दीपक मानकर यांच्या नावाची चर्चा आहे. पण निवडणुक ही काँग्रेस विरुद्ध भाजप अशीच होण्याची शक्यता आहे. असं असतांना पुण्यातून भाजपकडून देवेंद्र फडणवीस लढण्याची शक्यता आहे, अशी राजकीय वर्तुळात जोरात चर्चा सुरू आहे. पुणे लोकसभा निवडणुक देवेंद्र फडणवीस लढविणार अशी चर्चा सुरू आहे.तर तुम्ही निवडणुक लढविणार का ? या प्रश्नावर कसबा विधानसभा मतदार संघाचे काँग्रेस पक्षाचे आमदार रविंद्र धंगेकर म्हणाले मी ३० वर्षापासुन राजकीय जीवनात आहे.या संपूर्ण कालावधीत कसबा विधानसभा मतदारसंघात विविध प्रभागातून नगरसेवक म्हणून पुणे महापालिकेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्या प्रत्येक निवडणुकीत समाजातील सर्व घटकांनी संधी दिल्याने नगरसेवक म्हणून काम करता आले.त्याच दरम्यान मागील वर्षी झालेली कसबा विधानसभा पोटनिवडणुक सर्व सामान्य नागरिकांनी हातामध्ये घेतल्याने मी आमदार झालो आहे.धंगेकर पुढे म्हणाले की आता लोकसभा निवडणुक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे आणि पुन्हा एकदा माझ्या नावाची या निवडणुकीसाठी चर्चा सुरू झाली आहे. जर मला काँग्रेस पक्षाने निवडणुक लढविण्याची संधी दिल्यास नक्कीच लढेल आणि जिंकेल देखील, तसेच पुणे लोकसभा मतदारसंघातून भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा आहे. पण या सर्व चर्चेवर एकच सांगू इच्छितो, पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी राहिले आहेत.

# मुख्यमंत्री जो उमेदवार देतील त्याचं काम करणार

## पुणे म्हाडाचं अध्यक्षपद मिळाल्यानंतर आढळराव पाटील नरमले?

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।

शिरूर लोकसभेसाठी आग्रही असलेल्या शिवाजीराव आढळराव पाटील यांना म्हाडाचे अध्यक्षपद देऊन त्यांचा पत्ता कट केल्याची चर्चा सुरू आहे. त्यावर आढळराव पाटलांनी प्रतिक्रिया दिली आहे. तुम्ही समजता तसं काही नाही, मुख्यमंत्री जो उमेदवार देती त्याचं काम करणार अशी भूमिका आढळराव पाटलांनी घेतली. मला लोकसभा मिळाली नाही तरी चालेल, तिकीटासाठी कधीच मी फिरत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतील तसे काम करणार असं ते म्हणाले. शिरूरच्या उमेदवारीवर बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, ''मुख्यमंत्र्यांनी मला काम थांबवू नका असं सागितले आहे. पण जो पक्ष देईल तो आदेश





मानणार, काम करणार. मी शिवसैनिक आहे,अर्थात धनुष्यबाणावर लढायला आवडेल. शिरूरमधून सुनेत्रा पवार किंवा वळसे पाटील उभा राहतील असं वाटत नाही. मी माझा जास्त वेळ माझ्या लोकसभा मतदारसंघात फिरत होतो, लोकांच्या अडचणी सोडवत फिरत होतो. आज म्हाडा अध्यक्षपद स्वीकारलं आहे. मुख्यमंत्र्यांनी जबाबदारी टाकली. पण आपल्या सर्वांना वाटतं पत्ता कट झाला की काय? पण तसे काही नाही.''शिरुरची जागा दोन नंबरची मतं घेतलेल्या शिवसेनेला जायला हवी, यावर आता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री ठरवतील. अजित पवार आणि मुख्यमंत्री जो उमेदवार देतील त्याचं काम आम्हाला काम करावं लागलं असं आढळराव पाटील म्हणाले. मी शिवसैनिक आहे, अर्थात धनुष्यबाणावर लढायला आवडेल असंही ते म्हणाले. म्हाडाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर आढळराव पाटील म्हणाले, आपण समजत होतो किंवा लोक समजतात तसे नाही. संस्था कर्मचारी सगळं चागलं आहे, मुख्यमंत्र्यांनी स्वस्तात गोरगरिबांना घरं देण्यासाठी चागलं काम करण्याची संधी आहे. अमोल कोल्हे अपयश झाकण्यासाठी बेंबीच्या देठापासून भाषण करत आहेत असं सांगत आढळराव पाटील म्हणाले की, पाच वर्षात त्यांना काही जमलं नाही. मी मंजूर केलेली पाच बायपास रस्ते कामे माझीच आहेत. जो काम करत नाही ते क्रिडीट घेण्याच काम करत आहेत. बैलगाडा शर्यतसाठी मी काम केलं, त्यासाठी अनेकजणांनी आंदोलन केली आहेत. मी अमोल कोल्हे याच्यासारखे पक्ष बदलले नाहीत. अमोल कोल्हे यांनी अनेकदा पक्ष बदलले. ते नेते आहेत की अभिनेते त्याचे त्यांनाच माहिती. मी आहे त्याच शिवसेनेत आहे. मला लोकसभा मिळाली नाही तरी चालेल, तिकीटासाठी कधीच मी फिरत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतील तसे काम करणार. मला लोकसभा मिळाली नाही तरी चालेल, तिकीटासाठी कधीच मी फिरत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतील तसे काम करणार असं ते म्हणाले. शिरूरच्या उमेदवारीवर बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, ''मुख्यमंत्र्यांनी मला काम थांबवू नका असं सागितले आहे. पण जो पक्ष देईल तो आदेश मानणार, काम करणार. मी शिवसैनिक आहे,अर्थात धनुष्यबाणावर लढायला आवडेल. माझ्या लोकसभा मतदारसंघात फिरत होतो, लोकांच्या अडचणी सोडवत फिरत होतो. आज म्हाडा अध्यक्षपद स्वीकारलं आहे. मुख्यमंत्र्यांनी जबाबदारी टाकली. पण आपल्या सर्वांना वाटतं पशिरुरची जागा दोन नंबरची मतं घेतलेल्या शिवसेनेला जायला हवी, यावर आता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री ठरवतील. अजित पवार आणि मुख्यमंत्री जो उमेदवार देतील त्याचं काम आम्हाला काम करावं लागलं असं आढळराव पाटील म्हणाले. मी शिवसैनिक आहे.

# बारामतीत मला एकटं पाडलं जाईल : अजितदादा

## तरुणांचा वाढता प्रतिसाद आम्हाला मिळत आहे : जय पवार

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।

अजित पवारयांनी बारामती लोकसभेला शड्डू ठोकल्यानंतर मतदारसंघात दौऱ्यावर दौरे सुरु आहेत. वरिष्ठ भावनिक करतील म्हणत टीका केलेल्या अजित पवार यांनीच आता बारामतीमध्ये मला एकटं पाडलं जाईल म्हणत वेगाने भावनिक प्रचार सुरु केला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांनीही आज (२२ फेब्रुवारी) बारामती दौरा केला.







बारामतीतील राष्ट्रवादी भवन या कार्यालयाला जय पवारांनी भेट दिली. यावेळी सोशल मीडियाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जय पवार यांनी केल्या. जय पवार म्हणाले की, आम्हाला लोकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. पक्षफुटीनंतर कोणताही फरक वाटत नाही. आमच्यासोबत जनता आहे. तरुणांचा वाढता प्रतिसाद आम्हाला मिळत आहे. लोकांच्या समस्या मी अजित दादांना सांगणार असून दादा त्यावर मार्ग काढतील. महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळेच उमेदवार असल्याने कुटुंबातील लढाई अवघड जाईल का? असे विचारले असता जय पवार यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, अजून उमेदवार निश्चित झालेला नाही. यापूर्वी दोनदा मी प्रचार केला आहे आताही प्रचार करेन. सुनेत्रा पवारांची चर्चा होत आहे, पण ज्यावेळी दादा आपला उमेदवार जाहीर करतील त्यावेळी आपल्याला समजेल कुटुंब म्हणून मी अजित पवारांना विचारल्यानंतर त्यांनी आपल्याला प्रचार करायचा असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, आपण प्रचार करू ज्यावेळी उमेदवार जाहीर होईल, आपण उमेदवाराचा प्रचार करू.उमेदवार अजून माहीत नाही. त्यामुळे आपल्याला अवघड जाईल का नाही? हे सांगता येत नाही, पण तरीही आपण समजून घेऊ की प्रचार करणे अवघड जाणार आहे. कुटुंबाला एकटं पाडले आहे असं मलाही वाटत नाही. जेव्हा प्रचार सुरू होईल तेव्हा कळेल कोण कुणाच्या बाजूनं आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांनीही बारामती दौरा केला. बारामतीतील राष्ट्रवादी भवन या कार्यालयाला जय पवारांनी भेट दिली. यावेळी सोशल मीडियाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जय पवार यांनी केल्या. जय पवार म्हणाले की, आम्हाला लोकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.